# महाराष्ट्राच्या संस्कृतीबाबत

भारताच्या पश्चिमेस स्थित असलेले महाराष्ट्र हे वैविध्यपूर्ण व संपन्न अशी संस्कृती असलेले राज्य आहे ज्यात परंपरा, भाषा, कला व विभागीय संस्कृतीचा संगम दिसून येतो. राज्याच्या भूभागात अरबी समुद्राचा विस्तीर्ण किनारा, घनदाट पश्चिम घाट व रखरखीत दख्खनचे पठार यांचा समावेश होतो. हा भूप्रदेश महाराष्ट्राच्या प्रदेश व उपप्रदेशांची वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

हिरवागार भू प्रदेश व आकर्षक समुद्रकिनारा असणारा कोकण प्रदेश समुद्राशी संबंधित असलेली संस्कृती दर्शवितो. नारळ, भात व मच्छीचा अंतर्भाव असलेल्या तेथील खाद्य संस्कृतीक मालवणी मच्छी रस्सा व सोलकढी चा समावेश होतो. परंपरेने चालणाऱ्या मच्छीमारी व्यवसायाने या भागाचे राहणीमान प्रभावित झाले आहे. कोकण प्रदेशातील दशावतार हे पारंपारिक नृत्य रंगबिरंगी पोशाख व बोलक्या हावभावांचे जिवंत चित्रण करते.

पश्चिम महाराष्ट्र कृषी क्षेत्रातील उत्पादनांमुळे प्रसिद्ध आहे ज्यात राज्याच्या साखर कारखान्यांमध्ये मुख्य भूमिका पार पाडणाऱ्या उसाच्या शेतीचा समावेश होतो. या प्रदेशातील संस्कृतीत मनमोहक अदाकारी व पारंपारिक संगीतामुळे लावणी या लोककलेला महत्त्वाचे स्थान आहे.

महाराष्ट्राच्या पश्चिम भागात स्थित विदर्भाची ही खास सांस्कृतिक ओळख आहे ज्यात ज्वारी व बाजरीचा समावेश असलेल्या मसालेदार खाद्यपदार्थांचा अंतर्भाव होतो. तसेच समृद्ध जमातींचा वारसा येथे पहावयास मिळतो.

मराठवाडा हा प्रदेश औरंगाबाद येथील बीबी का मकबरा सारख्या ऐतिहासिक स्थळांसाठी ओळखला जातो. त्यास समृद्ध इतिहास आहे व संपन्न कारागिरी ज्यात प्रसिद्ध पैठणी साड्यांचा समावेश होतो ज्यामुळे क्लिष्ट कलात्मकतेचे दर्शन घडते. पूर्वेचे ऑक्सफर्ड म्हणून ओळखले जाणारे पुणे सांस्कृतिक ठिकाण म्हणून नावारूपाला आले ज्यात पारंपारिक व आधुनिक संस्कृतीचा मिलाफ दिसून येतो. येथे पारंपारिक संगीत महोत्सवासोबत शिक्षण व कला क्षेत्राचीही भरभराट दिसून येते.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिकला कुंभमेळामुळे व वाढत्या लोकप्रियतेच्या वाईन उद्योगामुळे वेगळी ओळख प्राप्त झाली आहे ज्यात धार्मिक परंपरांसोबत द्राक्षकृषीचा समावेश आहे.

पूर्वेकडील महाराष्ट्रात गोंड, भिल्ल व वारली या विविध आदिवासी जमातींकडून त्यांच्या पारंपारिक कला, संगीत व नृत्यकलेची जपणूक केली जाते. याशिवाय महाबळेश्वर व माथेरान सारख्या पश्चिम घाटातील थंड हवेच्या ठिकाणी नैसर्गिक रमणीय भूप्रदेशात इंग्रजांच्या काळातील स्थापत्य, स्ट्रॅाबेरीची शेती व अल्हाददायक वातावरण पर्यटकांना आकर्षित करणारे ठरते.

विशेष सांस्कृतिक परंपरा असलेल्या महाराष्ट्रात तीर्थयात्राही पहावयास मिळतात. साईबाबांचे स्थान असलेले शिर्डी तर पंढरपूर हे वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेले महाराष्ट्र तुळजापूर, कोल्हापूर व माहूर हे तीन तर नाशिक जिल्ह्यातील वणी येथील सप्तशृंगी देवी हे अर्धा अशा विख्यात साडेतीन शक्तीपिठांचे माहेरघर मानले जाते. प्रसिद्ध सिद्धिविनायक व त्रिंबकेश्वर सर्वदूर पसरलेल्या भक्तगणांना एकत्र आणणारे श्रद्धास्थान मानले जाते.

महाराष्ट्रातील सांस्कृतिक नृत्य व संगीताने सामाजिक भाष्य, अभिव्यक्ती कथन व स्थानिक ओळख प्राप्त करून देणारे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तमाशा हा संगीत व नृत्याचा समावेश असलेल्या पारंपारिक नृत्य प्रकार महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात निर्मितीस आला. त्यातील मनमोहक व रंगबिरंगी सादरीकरणामुळे प्रेक्षक वर्गास आकर्षित करण्याची क्षमता दिसून येते. ही कला सतराव्या शतकापासून महाराष्ट्रात दिसून येते. यातून मनोरंजन व सामाजिक प्रतिबिंबाचे दर्शन होते. झाडीपट्टी हा महाराष्ट्रातील अजून एक पारंपारिक कलेचा प्रकार जो बारकावे तपशिलांसह रंगबिरंगी सादरीकरणातून स्थानिक लोककथांची व परंपरांची मांडणी करण्यात येते.

महाराष्ट्रातील पारंपारिक वाद्यांमध्ये ढोलकी व लेझीमचा समावेश होतो. कोळी बांधवांचा कोळी नृत्य प्रकार म्हणजे सागरी किनाऱ्यावर वास्तव्य करणाऱ्या जमातींचा नृत्य प्रकार होय. विख्यात कवी व संगीतकार यांनी साकारलेली भावगीते व नाट्य संगीतामुळे राज्याचे संगीत क्षेत्र संपन्न झाले आहे. पंडित भीमसेन जोशी व किशोरी आमोणकर यांच्यासारख्या दिग्गज गायकांमुळे शास्त्रीय संगीताचे क्षेत्र समृद्ध बनले आहे. तसेच भजन व अभंगांमुळे भक्तिसंगिताचे क्षेत्र समृद्ध बनले आहे ज्यातून संत कवी संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर यांनी मूर्त स्वरूप दिलेला अध्यात्मिक वारसा प्रतिबिंबित होतो.

युनेस्कोने जाहीर केलेले जागतिक वारसा स्थळांमध्ये अजंठा व वेरूळ लेण्या प्राचीन भारतीय स्थापत्य व कलेचे उत्तम उदाहरण मानले जाते. लेण्यांमधील पाषाणमूर्ती व चित्रकला हे वाकाटकांच्या काळातील समृद्ध परंपरेची साक्ष देतात. तसेच कार्ले, भाजे, कोंढाणे, कान्हेरी व घारापुरी लेणी हे महाराष्ट्राच्या कलापरंपरेचे उत्तम उदाहरण मानले जातात. पारंपारिक कला पाषाण व लाकडावरील कोरीव काम, पैठणची पैठणी साडी याशिवाय बॉम्बे आर्ट सोसायटी, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स, नाशिक कला निकेतन व आर्ट सोसायटी ऑफ इंडिया हे महाराष्ट्राच्या कलात्मक भूप्रदेशात आजही भर टाकत आहेत.

मराठी साहित्य जे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे, हे गेली हजारो वर्षे वैविध्यपूर्ण कल्पना, सामाजिक चळवळी व कलेच्या सादरीकरणाचे एक माध्यम आहे. त्याची उत्पत्ती ही आठव्या ते बाराव्या शतकातील जैन व बौद्ध परंपरांपासून प्रेरित असलेल्या कुवलयामाला व लीळाचरित्र यासारख्या धार्मिक व तात्विक ग्रंथांपासून झालेली आहे. यास पुढे तेराव्या ते सतराव्या शतकापर्यंत चाललेल्या भक्ती चळवळीने आकार दिला ज्यात ज्ञानेश्वर, नामदेव व एकनाथ यासारख्या संत कवींच्या भक्तीमय रचनांचा समावेश होतो. 17 व्या ते 19 व्या शतकात संत एकनाथ तुकाराम व रामदास यांच्या काव्यरचनांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

ब्रिटिश काळात विष्णुशास्त्री चिपळूणकर व बाळ गंगाधर टिळक यांच्याकडून आधुनिक साहित्याची वाढ झाली. तर महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी साहित्यातून सामाजिक चळवळीचे नेतृत्व केले. त्याच्या पुढील काळात साहित्यिक पु. ल. देशपांडे, वि. सा. खांडेकर, विंदा करंदीकर, ना. सं. इनामदार, शांता शेळके, ना. धों. महानोर यांचे योगदानाने मराठी साहित्य समृद्ध बनले. त्यांच्या या योगदानामुळे प्रख्यात साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, जसे विष्णू सखाराम खांडेकर, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज विष्णू वामन शिरवाडकर व भालचंद्र नेमाडे.

गणेश चतुर्थी, नववर्षाचे स्वागत गुढीपाडव्याने व शेतकऱ्यांकडून ऋण व्यक्त करणारा पोळा हे सण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उत्सवांमध्ये गणले जातात. उपवास व चंद्राची पूजा केली जाणारा कोजागिरी पौर्णिमा, हिवाळ्यात तिळगुळ बनवून व पतंग उडवून साजरी केली जाणारी संक्रांत, कृष्ण जन्म साजरा करणारा दहीहंडी उत्सव तर दिवाळी, होळी, नागपंचमी हे सण सांस्कृतिक वैविध्येत भर घालतात.

महाराष्ट्राच्या खाद्य संस्कृतीवरही येथील इतिहास व भूगोलाचा प्रभाव दिसून येतो. तळलेले बोंबील, कोलंबीचे कालवण यासारखे पदार्थ सागरी किनारपट्टीचे वैशिष्ट्य आहे. तर पदपथावरील खाद्य पदार्थांमध्ये वडापाव, पावभाजी, भेळपुरी व मिसळपाव यांचा समावेश होतो. याशिवाय पुरणपोळी, पुरी भाजी, भाकरी व मोदक व श्रीखंडासारखे मिष्ठान्न हे पारंपारिक महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ मानले जातात.

महाराष्ट्रात गडकिल्ले व ऐतिहासिक वारसा स्थळांचाही समृद्ध ठेवा आहे. राजगड, रायगड, शिवनेरी, प्रतापगड, सिंहगड, तोरणा, लोहगड, पन्हाळा, मुरुड, जंजिरा हे मराठी लष्करी सामर्थ्य व अभियांत्रिकी कौशल्याची साक्ष देतात. तर घनदाट जंगलातील किल्ले व सागरी किल्ले हे मराठ्यांच्या इतिहासाचे वैशिष्ट्य दर्शवणारे किल्ले ठरतात.